# तात्या टोपे

# यांचा

# पोवाडा — : ९

तात्या टोपे चाल करोनी हल्ला करण्याला आला । ऐकुनि झाल
शत्रु घाबरा वंदन करितों मी त्याला ( तात्याला ) ॥ ध्रु० ॥

● ●

## चौक १ ला

नाशीक जिल्ह्यांतिल गांव । येवलें गांवाचं नांव ॥ जी ॥ **पांडुरंगपं**
राहती येवलें गांवाला ॥ त्याचा मुलगा रघुनाथ झाला वंद्य सकलाला
१८१४ सालाला । रघुनाथ आला जन्माला । रघुनाथ दिसामासां
मोठा जाहला ॥ १८१८ सालाला । पेशवाई गेली अस्ताला । आ
लाख रुपये पेन्शन बाजीरावाला । तंवा बाजीराव गेले बिठुरला । पांडुरं
पंतही गेले त्याच गांवाला । रघुनाथ तात्याही गेले संगें त्या वेळा
असा कांहीं काळ मग गेला । रघुनाथ मोठा जाहला । तंवा बाजीरा
प्रसन्न झाला । अन् त्यानं एक टोपी दिली रघुनाथाला ॥ टोपी
दिमाख मोठा झाला । रघुनाथाच्या घातली डोक्याला । तेंव्हांपास
रघुनाथ **तात्या टोपे** जाहला ॥ जी ॥ चाल ॥ **नानासाहेब बाळासा**
दोन । भाऊ जसे भीम अर्जुन ॥ **रावसाहेब** पुतण्या नानाचा । अभिम
जसा शौर्यानं ॥ तात्या टोपे चुणचुणीत छान । **मनुबाइ** छ
गुणवान ॥ जी ॥ चाल ॥ पेशव्यांच्या वाड्यामधिं मुलं खेळति खेळाल



भाल्याची फेंक, तलवार, पट्टा बंदूक, घोड्याची दौड हे खेळ खेळतीं
त्या वेळा ॥ या खेळांत झाला तरबेज मुलांचा मेळा ॥ १ ॥

● ●

## चौक २ रा

हिंदुस्थानावर राज्य करण्याची हांव सुटली कंपनीला । संस्थानांचा
बळी घेतला लागोपाठ तिनं त्या वेळां ॥ राज्य सातारा तंजावरही
नागपूर झांशी यादीला । पंजाब, सिकीम, ब्रह्मदेशाचा अर्धा तुकडा तो
गिळला ॥ जी ॥ दिल्ली अयोध्या याच यादीला असा कहर हा जुलुमाचा ।
डलहौसी भस्मासुर उठला ग्रास कराया सर्वांचा ॥ जी ॥ चाल ॥
बाजीराव गेला मरून । बंद झालं त्याचं पेन्शन ! ॥ नानासाहेब पेशवे
वारस होते वतनाला ॥ त्यांनीं विचारलं कंपनीला । कीं "मी वारस
आहे पेन्शनाला । मग तनखा बंद कां केला सांगा आम्हांला" । पण
साहेबानं जवाब तंवा दिला । "तुम्हीं औरस नाहीं वतनाला । शिवाय
बाजीरावानं पैसा असेल ठेवला । तो पुरेल तुमच्या जन्माला" ॥
अशा कैक जुलमानी गांजलं साऱ्या लोकांला ॥ जी ॥ २ ॥

● ●

## चौक ३ रा

गुलामगिरिच्या बेड्या पडल्या हिंदभूमिच्या पायांत । तडतड तोडुनि
मुक्त कराया कैक तरुण ते तळमळत ॥ जी ॥ सैन्यांत बंडाळी झाली ।
ती फौज बिथरली सारी ॥ २९ मार्च १८५७ ला । नवीं काडतुसं दिलीं
शिपायाला । गाई डुकरांचीं चरबी लावली त्याला ॥ बराकपुरचे
पलटणवाले शिवेनांत तसल्या काडतुसाला । तंवा शिपायांना शिक्षा
करण्याला । कंपनीनं पलटणच रद्द केली त्या वेळा ॥ तंवा मंगलपांडे
शिपाई भडकला । अन् त्यानं उघड उघड केला साहेबावर हल्ला ॥
गोरे अधिकारी धांवले त्याला पकडायला । त्यांनीं पकडलं शूर वीराला ।

अन् ६ एप्रिल १८५७ च्या दिवसाला। फांसावरती त्यांनीं चढविलं मंगलपांडेला ॥ क्रान्तीचा वणवा जागजागीं धुमसूं लागला ॥ ३ ॥

● ●

## चौक ४ था

३१ मे १८५७ दिवस ठरविला बंडाचा। चहुबाजूंनीं उठाव करावा बेत असा हा सर्वांचा ॥ मिरत गांवाचे शूर शिपाई अधीर झाले बंडाला। १० मे रोजींच उठाव केला त्यांनीं बंडाचा मिरतेला ॥ मिरतेहून मग शिपाई सारे तडक चालले दिल्लीला। दिल्ली जिंकुन बादशहाला पुन्हां बसविलं तख्ताला ॥ चाल ॥ लखनौनं पेट घेतला। जगदीशपूर यादिला। **कुंवरसिंह** ८० वर्षांचे होते आघाडीला। अमरासिंह भाऊही होता त्यांच्या मदतीला ॥ अयोध्येनं शत्रुरक्ताचा पाट वाहाविला ॥ जी ॥ तंवा कानपुरला प्रकार काय झाला। कंपनीचा खाजिना होता कानपुरला। तंवा त्याचं रक्षण करण्याला। **व्हीलरनं** बोलवलं नानाला। "नानासाहेब, कंपनीचे मित्र तुम्हीं झाला। आतां खजिन्याचं रक्षण करण्याला। तुम्हीं यावं धांवुन बक्षीस देऊं तुम्हांला ॥ नानानं संधीचा फायदा पुरा घेतला॥ तीनशें लोक घेतले मदतीला। दोन तोफा मारा करण्याला। **तात्या टोपे** चालले त्या वेळा ॥ २२ मे ला गेले कानपुरला। इंग्रजांच्या छावणींतच तळ त्यांनीं तंवा दिला! ॥ ४ ॥

● ●

## चौक ५ वा

चार जूनचा सूर्य उगवला तसाच गेला अस्ताला। मध्यरात्रीला भडका उठला बंडाचा झेंडा चढला ॥ नाना पेशवे, तात्या टोपे टीकासिंग सुभेदार। चतुर योजना त्यांची पाहुन बावरले **सर व्हीलर** ॥ चाल ॥ कानपुरच्या एका कोटांत इंग्रजहि जमले ॥ शिपायांनीं



जोरानें कैक हल्ले चढविले ॥ २३ जूनचा दिवस उगवला। असा समज होता झालेला। त्या दिवशीं वर्ष शंभर साहेबी राज्याला ॥ अन् कंपनीचं राज्य बुडणार त्याच दिवसाला ॥ म्हणून निकराचा हल्ला सुरूं झाला। सर व्हीलर शरण मग आला। तारीख २५ जूनच्या दिवसाला। कंपनीचं राज्य जणुं वाटलं गेलं अस्ताला ॥ ५ ॥

● ●

## चौक ६ वा

१८५७ ला। जुलैच्या पहिल्या तारखेला। अभिषेक नानासाहेबांला। झाला ब्रह्मावर्त नगराला। पण इंग्रज चढाई करण्याला धांवून आला! ॥ सेनापति **रेनॉड, हॅवेलॉक** आले लढण्याला। तंवा नशिबाचा फांसा उलटला। १७ जुलैच्या हो दिवसाला। कानपुर जिंकलं इंग्रजानं फांसा उलटला ॥ सेनापतिपद नानानं दिलं तात्याला ॥ काल्पीवरती हल्ला चढविला। अन् विजयाचा झेंडा उभा केला। राजधानी केली काल्पीला। रावसाहेब पेशवे मग गेले काल्पी गांवाला ॥ तंवा शत्रूला हैराण करण्याला। तात्या चालले मुलुखगिरिला। कानपुरावर हल्ला चढविला। **विंढ्यामचा** पुरा मोड केला। सैन्याचा धुव्वा उडविला। विल्सन, मेक्रिया, मर्फी, स्टर्लिंग, बिबिन्स्–हे सारे मोठे लढवय्ये पडले भूमिला ॥ जी ॥ डिसेंबरच्या ६ व्या तारखेला। लखनौस्नं सेनापति **कॉलिन्स्** धांवून आला ॥ पुन्हां मोठा संग्राम झाला। इंग्रजानं विजय मिळविला। पुन्हां सारे देशभक्त गोळा झाले काल्पीला ॥ जी ॥ पुन्हां इंग्रज चालून आला। काल्पीला पराभव झाला। गेले ग्वालेरला। ग्वालेरला मुकाबला झाला। १८ जून १८५८ ला। झांशीच्या राणीनं प्राण दिले देशाला। धारातीर्थीं देह ठेविला। बंडवाले पडले भूमिला। पण तात्याचा धीर नाहीं खचला ॥ त्याचा पुढचा बेत सांगीन पुढच्या चौकाला ॥ जी ॥ ६ ॥

● ●

## चौक ७ वा

वाऱ्यासारखा तात्या टोपे गरगर फिरला चोंहीकडे ॥ फुंक मारुनी जादुगार हा सैनिक करतो रणीं खडे ॥ आज इथें तर उद्यां तिथें हा करितो शार्दुल संचार। इंग्रज सेनापति चपापत पाहुनिया हा रणवीर ॥ मानसिंगाचा आश्रय घ्याया वीर निघुनिया हा गेला। मानसिंग पण फितुर होऊन पकडून देतों वीराला ! ॥ १८५९ सालीं एप्रिल ७ व्या दिवसाला ॥ तात्या टोपे हातीं लागला, इंग्रज आनंदून गेला ॥ चाल ॥ मग नेले त्याला शिप्रीला। **जनरल मीड** न्याय देण्याला। तात्याची जबानी झाली त्याच जागेला ॥ तो खंदा वीर बोलला ॥ "पेशव्यांचा नोकर हा झाला। त्यांच्या आज्ञा मान्य हो मला। म्हणून मी केलं युद्धाला। हा तात्या मारेकरी खुनी कधीं नाहीं झाला ॥ लढाईंत समोरासमोर मार घेतला अन् मार दिला। यांत अपराध कोणता मी केला ? । जर मी अपराध केलाच असेल तर तोफेच्या तोंडीं द्या मला। तेंच मरण योग्य वीराला" । १८ एप्रिलच्या हो दिवसाला। १८५९ ला। दुपारीं ४ च्या ठोक्याला। तात्याला फांसावर दिलं—धन्य जाहला ! ॥ **पांडुरंग** शाहीर गातो त्याच्या कवनाला ॥ जी ॥ ७ ॥

रचना—२-७-५३, मुंबई.